सन २०१८-१९ मध्ये कृषी उन्नती योजना- एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (MIDH) अंतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत अनुसुचित जमाती प्रवर्गाकरिता दुसऱ्या हप्त्याच्या रुपये ७५० लाख निधी वितरित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि,पशुसंवर्धन,दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय विभाग
शासन निर्णय क्र. राफअ-२०१८/प्र.क्र.१७७/९-अे
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १२ मार्च, २०१९

<u>संदर्भ</u>:- १. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्र.राफअ-२०१८/प्र.क्र.१६८/९-अे, दि.०६/०६/२०१८

२. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्र.राफअ-२०१८/प्र.क्र.१७६/९-अे, दि.१२/०७/२०१८

३. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२/०४/२०१८ व दि.२५/०१/२०१९

४. केंद्र शासनाच्या कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभागाचे पत्र क्र. एफ.क्र. १८-२४/२०१७-एमआयडीएच, ३०/०१/२०१९ चे पत्र.

५. संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे यांचे जाक्र.मराफऔवमं/लेखा/३१८/२०१९, दि.०४/०२/२०१९चे पत्र.

<u>प्रस्तावना:-</u>

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान ,फळे, भाजीपाला, कंदमुळे, मश्रूम, मसाले, फूल, सुगंधी वनस्पती, नारळ, काजू, कोको आणि बांबू इ. उत्पादनांच्या चतुरस्त्र विकासाकरिता राबविण्यात येणारी केंद्रपुरस्कृत योजना आहे. सदर योजना सन २०१५ -१६ पासून केंद्र व राज्य हिस्सा ६०:४० या प्रमाणात राबविण्यात येत आहे.

संदर्भाधीन क्र.४ च्या पत्रान्वये केंद्र शासनाने सदर अभियानाकरिता अनुसूचित जमाती प्रवर्गाचा दुसऱ्या हप्त्याचा केंद्र हिश्श्याचा रू.४५०.०० लाख निधी मुक्त केला आहे. त्यास अनुसरुन शासन आता पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय:-

१. केंद्र शासनाने संदर्भाकित दिनांक ३०.०१.२०१९ रोजीच्या पत्रान्वये सन २०१८-१९ करिता एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाच्या दुसऱ्या हप्त्याचा केंद्र हिस्स्याचा ४५०.०० लाख (रुपये चार कोटी पन्नास लाख फक्त) निधी अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी वितरित केला आहे. या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमाती प्रवर्गाचा केंद्र हिस्सा रुपये ४५०.०० लाख (रुपये चार कोटी पन्नास लाख) व त्या समरुप राज्य हिस्सा ४० टक्के म्हणजे ३००.०० लाख (रुपये तीन कोटी फक्त) असा एकूण रुपये ७५०.०० लाख (रुपये सात कोटी पन्नास लाख) निधी पुढीलप्रमाणे वितरित करण्यात येत आहे.

(रुपये लाखात)

केंद्र हिस्सा (६० टक्के)	**राज्य हिस्सा (४० टक्के)**	**एकूण**
४५०.००	३००.००	७५०.००

२. सदर योजनेसाठी उपलब्ध होणारा अर्थसंकल्पीत निधी केंद्र शासनाने विहित केल्याप्रमाणे अनुसूचित जनजाती प्रवर्गासाठी पुढील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

	केंद्र हिस्सा	**राज्य हिस्सा**
अनुसुचित जनजाती	मागणी क्र.टी - ५, २४०१- पिक संवर्धन ७९६-अनुसूचित जनजाती क्षेत्र उपयोजना ०१-अनुसूचित जनजाती क्षेत्र उपयोजना अंतर्गत योजना (०१)(०६) कृषि उन्नती योजना - एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (अनुसूचित जनजाती) (कें.पु.यो.) (केंद्र हिस्सा,६० टक्के) ३३ अर्थसहाय्य (२४०१A०२९)	मागणी क्र.टी - ५, २४०१- पिक संवर्धन ७९६-अनुसूचित जनजाती क्षेत्र उपयोजना ०१-अनुसूचित जनजाती क्षेत्र उपयोजना अंतर्गत योजना (०१)(०७) कृषि उन्नती योजना- एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (अनुसूचित जनजाती) (कें.पु.यो.) (राज्य हिस्सा, ४० टक्के) ३३ अर्थसहाय्य (२४०१A०११)

३. सदर योजना राबविताना यापूर्वी निर्गमित शासन निर्णयातील तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात यावी.

४. योजनेअंतर्गत वितरित निधी जिल्हा स्तरावरुन खर्च करण्यात यावा. व सदर निधी अनुसूचित जमाती लाभार्थ्यांकरिता खर्च करण्याची दक्षता घ्यावी.

५. प्रस्तुत आदेश शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३ दि.२ एप्रिल, २०१८ व दि.२५ जानेवारी २०१९ नुसार विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच आदिवासी विकास विभागाने दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१२१५१४०१७३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Ashok Maroti Atram
Date: 2019.03.12 15:16:32 +05'30'

(अशोक आत्राम)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:-

१. मा.मंत्री (कृषी), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे खाजगी सचिव

२. मा. कृषि राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे खाजगी सचिव,
३. सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद सदस्य,महाराष्ट्र राज्य.
४. मा.अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
५. मा.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग,मंत्रालय, मुंबई ३२,
६. मा. सचिव, (कृषि) कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई,
७. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
८. व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ,साखर संकुल,शिवाजी नगर,पुणे,
९. संचालक (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१०. राज्यातील सर्व विभागीय कृषि सह संचालक,
११. राज्यातील सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
१२. विविध राष्ट्रीय मंडळावरील महाराष्ट्राचे सदस्य म्हणून कार्यरत असलेल्या जिल्ह्यातील व्यक्ती,
१३. राज्यातील फळे/फुले उत्पादक संघाचे प्रतिनिधी,
१४. निवडनस्ती, कार्यासन ९- अे.